# खेळघर

पालकनीती परिवाराचा प्रकल्प

## वार्तापत्र

**ऑगस्ट २०२४ ते जुलै २०२५**

नवीन शैक्षणिक वर्ष! एक पान उलटले ! सध्या खेळघरासाठी मोठा कठीण काळ चालू आहे. अनेक आव्हानांच्या ढगांनी आकाश झाकोळून गेले आहे. या वार्तापत्राची सुरुवातच प्रश्न, आव्हानांनी होते आहे खरी... पण थांबा.... या सगळ्या परिस्थितीला आमची एकदिलाने काम करणारी टीम कसे तोंड देते आहे, याबद्दल देखील आपणाला सांगायचे आहे.

### • शिक्षकांची कमतरता

खेळघरातील रोजच्या कामांची जबाबदारी घेणाऱ्या आमच्या दोन अनुभवी शिक्षिका प्रसूतीसाठीच्या रजेवर गेल्यामुळे कामांची जबाबदारी इतरांवर आली. खेळघराची समन्वयक अनुराधाताई नसल्यामुळे समन्वयाची जबाबदारी प्रियांका पाटील आणि शुभदा जोशी यांच्यावर आली. नवीन शिक्षिका शोधणे, त्यांनी तयार व्हावे यासाठीचे प्रयत्न... दरम्यान अचानक येणारे प्रश्न ... अशी तारांबळ उडाली.

संस्थेतील साठीच्या पुढच्या आम्हा कार्यकर्त्यांना पुन्हा एकदा कंबर कसणे भाग पडले. नवे तरूण कार्यकर्तेदेखील मनापासून साथ देत आहेत. सर्व टीममध्ये छान एकी राहावी, समजूत आणि आदर राहावा म्हणून दर पंधरा दिवसांनी सर्वांचा संवाद गट असतो.

## विशेष वार्ता

- खेळघराच्या कामासंदर्भाने वर्षभरात सहा छोट्या फिल्म्स तयार झाल्या. त्यातील तीन फिल्म्स आपल्या प्रशिक्षणांमध्ये वापरण्यासाठी तयार केल्या आहेत. वोपा या संस्थेने 'सकारात्मक शिस्त' या विषयावर तीन फिल्म्स बनवल्या आहेत. मायलिन या संस्थेतर्फे खेळघराच्या भूमिके संदर्भात एक विस्तृत podcast देखील तयार झाला.
- खेळघराच्या कार्यकर्त्या अपर्णा क्षीरसागर ह्यांचे 'सोडवावे नेटके' हे नवीन पुस्तक प्रकाशित झाले. मुलांमध्ये व्याकरणाची समज निर्माण व्हावी आणि व्याकरणाचा हसतखेळत सराव व्हावा ह्या उद्देशाने माधुरी पुरंदरे यांनी लिहिलेल्या 'लिहावे नेटके' या पुस्तकाला खेळघराच्या मुलांपर्यंत घेऊन येणारे हे पुस्तक आहे.
- या वर्षी हिराम्मा हेडलगी ही मुलगी झूलॉजी मध्ये ७५ टक्के मार्कांनी BSc झाली, तिने पुढे MSW साठी प्रवेश घेतला आहे. नेहा खत्रावतदेखील इंटिरीयर डिझाइन हा विषय घेऊन ७५ टक्के मार्कांनी BSc पास झाली.
- संतोष पवार कॉम्प्युटर सायन्समध्ये MSc झाला. त्याचा CGP स्कोअर ७.८५ आहे.
- खेळघराचा माजी विद्यार्थी श्रीशैल बिराजदार युवकगटाच्या मुलांबरोबर रिसोर्स पर्सन म्हणून काम करत आहे. श्रीशैल २००४ मध्ये दहावी पास झाला. त्यानंतर MSW आणि social entrepreneurship मध्ये पदव्युत्तर शिक्षण केले आहे. काही वर्षे बार्टीमध्ये नोकरी करून आता स्वतःची सामाजिक संस्था सुरू केली आहे.
- वनस्थळी संस्थेकडून पालकनीती परिवाराच्या खेळघराला, संस्थेच्या संस्थापिका निर्मलाताई पुरंदरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कार मिळाला. बालशिक्षणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशा जुन्या आणि जाणत्या संस्थेकडून मिळालेला पुरस्कार आमच्यासाठी फार मोलाचा आहे.



### इंग्रजीचे वर्ग

गेल्या वर्षी आमच्या प्रिय दिपालीताई पोतदार यांचे अकाली निधन झाले. याचा धक्का पचवणे आम्हा सर्वांसाठी फार कठीण गेले. याचा मुख्य परिणाम इंग्रजीच्या वर्गांवर झाला. मानसी महाजन यांनी गेल्या वर्षी शिक्षकांचे इंग्रजी शिकवण्याचे प्रशिक्षण घेतले. काही शिक्षिकांनी इंग्रजीचे वर्ग घ्यायला सुरुवात केली. पण मराठी माध्यमातून शिकलेल्या काही शिक्षिकांना इंग्रजी शिकवण्याचा आत्मविश्वास वाटेना. वर्ग होईनात!

गेल्या वर्षी आम्ही नवीन स्वयंसेवी कार्यकर्ते मिळावेत यासाठी मोहीमच उघडली होती म्हणा ना! शुभदा जोशी यांनी वैयक्तिक संवाद साधून आणि दर महिन्याला सत्रे घेऊन कार्यकर्त्यांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला. यातून १५ ते २० नवीन कार्यकर्ते खेळघराच्या कामाशी जोडले गेले. खेळघराच्या पद्धतींचा अभ्यास करून त्यांनी मुलांबरोबर कामाची सुरुवात केली आहे. त्यातील पाच कार्यकर्त्यांनी वर्गताईच्या मदतीने मुलांना इंग्रजी शिकवण्याचे आव्हान घेतले आहे. त्यामुळे या वर्षी इंग्रजी भाषेचे वर्ग सुरळीत सुरू झाले आहेत.

### शाळांच्या सातत्याने बदलणाऱ्या भूमिका

गेल्या वर्षी सर्व सरकारी शाळांची वेळ बदलली. सकाळी ७ ते १२ ही वेळ बदलून १० ते ३ अशी वेळ झाली. याचा परिणाम आमच्या दुपारच्या (२ ते ४) वर्गांवर झाला. हे वर्ग आम्हाला बंद करावे लागले आणि संध्याकाळी नवीन वर्ग सुरू करावा लागला. या वर्षी शाळांच्या वेळा १० ते ४ करणार अशी बातमी आली आहे. यामुळे तर आम्हाला ४-६ चे वर्ग देखील घेता येणार नाहीत. संध्याकाळच्या वेळात सर्व वर्ग घ्यायचे तर तेवढी जागा उपलब्ध नाही.

गेल्या वर्षी सुरू केलेला पहिली ते चौथीच्या संध्याकाळच्या वर्गाला मुलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. म्हणून यावर्षी पहिली दुसरीचा



### खेळघराचे Close mentoring workshop

खेळघराच्या विस्तार प्रकल्पात आम्ही Wipro Foundation च्या समवेत गेली ४ वर्षे काम करत आहोत. दरवर्षी भारतभरातील वस्तीपातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबर सुमारे १५ दिवसांचे प्रशिक्षण आयोजित केले जाते. तसेच दरवर्षी दोन संस्थांसमवेत, सातत्याने त्यांच्या संपर्कात राहून त्यांच्या गरजांनुसार काम केले जाते. दिनांक १६-१९ एप्रिल २०२५ मध्ये अशा तीन संस्थांसाठी प्रशिक्षण आयोजित केले होते.

त्यातील समावेश ही संस्था गुजरात मध्ये मेहेसाणा भागात मीर, फकीर, देवीपूजक अशा भटक्या विमुक्त समुदायांसमवेत काम करते. यांची बहुसंख्य मुले शाळाबाह्य आहेत.

नवजीवन ही संस्था कल्याण भागातील कचरावेचक मुलांसमवेत शिक्षणाचे काम करते आणि ग्रामऊर्जा ही संस्था आंबेजोगाई भागात सरकारी शाळांबरोबर काम करते. ऊस तोडीसाठी ४-५ महिने स्थलांतरित होणाऱ्या येथील कुटुंबांचे प्रश्न जटिल आहेत.

या कार्यकर्त्यांबरोबर आम्ही ‘आनंदाने शिकण्याच्या दिशेने’ काम केले. शिकणे शिकवणे दोन्ही बाजूंनी होते. हे कार्यकर्ते ज्या समुदायांबरोबर काम करतात त्यांचे प्रश्न हलवून टाकणारे आहेत. गुजरातमधल्या तीव्र उन्हात दुपारच्या वेळी पायात चप्पल नसलेली मुले उन्हाचे चटके टाळायला धावत धावत वर्गाला येतात, असे प्रसंग सांगताना त्या कार्यकर्त्यांसमवेत सगळ्यांचेच डोळे पाणावत होते.

या तीनही संस्थादेखील अनेक अडचणींचा सामना करत काम पुढे नेत आहेत. वंचिततेच्या अनेक छटा या निमित्ताने आमच्यासमोर येत गेल्या.

अनेक कृती कार्यक्रमांच्या माध्यमातून शिकणे -शिकवणे या कार्यकर्त्यांसमोर उलगडत गेले. या कार्यशाळेमधून आम्हा सर्वांनाच सहभावनेतून मिळणारी प्रेरणा फार महत्त्वाची आहे.

आजच्या काळात, एकविसाव्या शतकात देखील, ज्यांची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर आहेत अशा वंचित समुदायांबरोबरल काम करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

एक आणि तिसरी चौथीचा दुसरा असे या गटाचे विभाजन केले आहे. त्यासाठी आणखी एक जागा भाड्याने घ्यावी लागली आहे.

एका बाजूला वस्तीतील जास्तीत जास्त मुलांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोचवायचे स्वप्न तर दुसरीकडे वाढत जाणारे खर्चाचे आकडे!

## • वस्तीतील बदलती परिस्थिती

पालकांचा शिक्षणाच्या प्रती विश्वास वाढला आहे. मुलांनी शक्य आहे तेवढे शिकावे असे त्यांना वाटते. मात्र इंग्रजी माध्यमात घालणे, क्लासेस लावणे अशा जनमानसात रूढ असलेल्या कल्पना त्यांच्या निर्णयांना दिशा देतात. कर्ज काढून मुलांच्या क्लासची फी भरली जाते. मुलांसाठी हे निर्णय बांधून घालणारे आहेत... त्यातून उलट त्यांचे नुकसानच होते आहे हे पालकांना पटत नाही. मुलांना मनापासून खेळघरात यायला आवडते पण ती दिवसभराच्या चाकोरीमुळे कंटाळून गेलेली असतात. त्यांना अभ्यास नको वाटतो, खेळच हवा असतो.

## • मोबाईलचा धुमाकूळ

प्रत्येक मुलाला स्वतःचा मोबाईल असणे आता जीवनावश्यक गोष्ट वाटते. आईवडिलांकडून मिळाला नाही तर आठवीच्या पुढची मुले स्वतः पैसे कमावून मोबाईल विकत घेतात. मुलांचा सगळा रिकामा वेळ मोबाईलवर जातो. रील्स बघण्याची आणि बनवण्याची चटक लागते. Match बघणे तर अत्यंत आवडीची गोष्ट! पोर्नोग्राफी बघून न कळत्या वयात प्रेम, लैंगिक संबंध, हिंसा यांची ओढ वाढते. व्यसनच लागते म्हणा ना मोबाईलचे!

आम्ही प्रयास संस्थेची किंवा मुक्ता चैतन्य यांची सत्रे मुलांसाठी आयोजित करतच असतो. पण हे प्रयत्न अपुरे ठरतात. या मोहजालात फसलेली काही मुले आमच्या डोळ्यांसमोर आहेत. अशा परिस्थितीत एकेकदा असहाय्य वाटू लागते.

## • आर्थिक प्रश्न

सर्वात महत्त्वाचा आहे तो आर्थिक प्रश्न! विप्रो आणि यार्दी फौंडेशन या दोन्ही संस्थांनी गेल्या वर्षीच त्यांचे हे आर्थिक मदतीचे शेवटचे वर्ष असेल असे सांगितले होते. आम्ही काही संस्थांकडे प्रस्ताव पाठवले आहेत, तरीही फक्त 'शशिकला फौंडेशन' सोडून कुठूनच अजून आर्थिक मदत मिळाली नाही. सोशल मिडियाच्या माध्यमातून अनेकांपर्यंत पोचणे अजून आम्हाला जमत नाहीये. खेळघराच्या मित्रमंडळींवर आता मदार आहे.

स्वतः देणगी देण्याबरोबरच आपल्या मित्र मैत्रिणींमध्येदेखील हे वार्तापत्र जरूर पाठवा. जेथून निधी मिळू शकतो अशा संस्था किंवा CSR चा संपर्क आम्हाला पाठवा.

## • गेल्या वर्षातल्या काही उत्साहवर्धक गोष्टी

मुलांमध्ये समजूतदार संवेदनक्षमता रुजावी, स्वतःचे आणि परिसराचे जीवन सुंदर करण्याचा आत्मविश्वास यावा म्हणून जीवन-कौशल्याचे शिक्षण फार महत्त्वाचे आहे. गेल्या वर्षी आम्ही 'स्वतःला शोधताना' हे तीन महिन्यांचे मोड्यूल - माझी माहिती, आवडी-निवडी, गुणदोष, चांगले-वाईट प्रभाव, भविष्याची आखणी अशा विविध भागांतून विकसित केले. उपक्रम सविस्तर लिहून काढले. सर्व शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले आणि पहिलीपासून सर्व इयत्तांमध्ये मुलांबरोबर त्यानुसार काम झाले.

## • 'कचरा व्यवस्थापन' विषयावरील प्रकल्प

फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल महिन्यात कचरा या विषयवर मुलांबरोबर काम करायचे ठरवले. आपण किती कचरा तयार करतो, त्याचे व्यवस्थापन कसे केले जाते? साठलेल्या कचऱ्याचे आपल्या जीवनावर काय दुष्परिणाम होतात? हे टाळण्यासाठी कचऱ्याचे वर्गीकरण कसे करायचे? एकूणात Reduce, Repair, Reuse and Recycle या चतु:सूत्रीनुसार मुलांची समज वाढावी आणि काही सवयी रुजाव्यात हा या प्रकल्पाचा उद्देश होता.

या विषयात रुबी रमा प्रवीण, आदिती देवधर, ओजस फाटक या कार्यकर्त्यांची मदत झाली.

मुलांनी कुजणारा आणि न कुजणारा कचरा या संदर्भातील प्रयोग प्रत्यक्षात वर्गात दोन कुंड्यांमध्ये करून पहिले. यातून कोरडा, न कुजणारा कचरा वेगळा काढणे का गरजेचे आहे हे लक्षात आले. कचऱ्याचा पुनर्वापर करण्यासाठी न कुजणारा प्लास्टिकचा कचरा एकत्र करून 'री-चरखा' येथे नेऊन दिला.

वस्तीतील कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे काम पाहणाऱ्या युवराज चाबुकस्वार यांच्याशी संवाद साधला. साठलेल्या कचऱ्याचे दुष्परिणाम दाखवणारे वेगवेगळे व्हिडिओ पाहिले.



पालकांबरोबरदेखील काम झाले. आरोग्य कोठीचे व्यवस्थापक वैजनाथ गायकवाड यांच्याशी झालेल्या संवादातून पालकांनी त्यांच्या अडचणी मांडल्या.

असा सर्व बाजूंनी कचरा व्यवस्थापन या विषयाचा अभ्यास झाला.

या व्यतिरिक्त मुलांची मने गुंतून राहतील, त्यांचा शिकण्यातला रस टिकून राहील यासाठी दिवाळी, गॅदरिंग, सहली, कलेचे उपक्रम, मागे राहणाऱ्या मुलांसाठी workshop असे अनेक उपक्रम घेतले.

### • कला सप्ताह

'आर्ट स्पार्क' या बंगलोरमधील संस्थेचे प्रशिक्षण घेऊन आल्यावर कला शिक्षणाची एक अनोखी पद्धती आम्हाला समजली. कलेच्या कामाचा आणि जीवन कौशल्यांचा संबंध नेमकेपणाने लक्षात आला. बारकाईने निरीक्षण, शोध घेणे, प्रयोग करून पाहणे, निर्णय घेणे, कल्पना करणे, चिकाटी अशा जीवन कौशल्यांवर कलेच्या उपक्रमात काम करायची संधी मिळते.

एप्रिलमध्ये रणजीत कोकाटे या आमच्या चित्रकार मित्राने आर्ट स्पार्कच्या पद्धतीने टप्प्याटप्प्याने मुलांसमवेत काम करण्याचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले. त्यानुसार प्रत्येक वर्गामध्ये ओले रंग वापरून चित्रे आणि 2D-3D मॉडेलिंग वापरून कोलाज असे काम केले.

५ दिवसांच्या या उपक्रमात मुले अगदी रमून गेली, सुंदर कलाकृती तयार झाल्या.

### • लेखन-वाचनात मागे राहणाऱ्या मुलांबरोबर सलग काम

मे महिन्यात सुजाता लोहोकरे यांनी खेळघरातील सर्व कार्यकर्त्यांसाठी उपचारात्मक शिक्षण पद्धतीचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणात नव्याने जोडले गेलेले स्वयंसेवी कार्यकर्तेदेखील सहभागी झाले. सुमारे २५ मुलांबरोबर सलग १५ दिवस रोज दोन



## खेळघराचे गॅदरिंग

गॅदरिंग म्हणजे सगळ्यांच्या मनात उत्साह जगवणारी एक सुंदर गोष्ट!

आपल्याला आवडणारी एखादी गोष्ट ठरवून, मनापासून प्रयत्नपूर्वक पूर्णत्वाला नेणे आणि सर्वांसमोर सादर करणे हे सारेच फार मनोहारी असते.

या वर्षी मुलांनी उत्तम नृत्ये सादर केली.

आपोआप ताल धरला जाईल अशी मस्त ठेका असलेली वेगवेगळ्या भाषांतली गाणी निवडली होती. त्यावर थिरकणारी मुले, मुली तो आनंद आमच्यापर्यंत पोचवत होती.

गाणी, कविता, नाटके असे अनेक कार्यक्रम बसवले होते.

इंग्लिश गाणी आणि गोष्टींच्या पुस्तकांवर आधारित नाटके हे या वर्षीचे वैशिष्ट्य होते. मुलांनीच बनवलेल्या रील्स चा वापरदेखील मस्त झाला. पालकांनीदेखील त्यांची मनोगते व्यक्त केली आणि एक धमाल नृत्यही सादर केले.

अशा कार्यक्रमांमधून मुले, शिक्षक, कार्यकर्ते एकमेकांच्या जवळ येतात. नात्याची गुंफण होते. हा आनंद दीर्घकाळ टिकणारा असतो.

आमची लाडकी ताई दीपाली पोतदार हिला श्रध्दांजली देताना गॅदरिंगमध्ये युवक गटाच्या मुलांनी मनोगते व्यक्त केली, तिने शिकवलेले गाणे सादर केले.

दीपक झेंडे या मुलाने त्या संदर्भातला व्हिडिओ तयार केला. या व्हिडिओनंतर सर्वांचे डोळे भरून आले होते....



तास काम झाले. एकेका कार्यकर्त्याकडे २-३ मुले असल्याने वैयक्तिक लक्ष देता आले. लेखन-वाचनाच्या पातळीवर मुले चांगलीच पुढे आली. आता या वर्षी इतर मुलांबरोबर तीही आत्मविश्वासाने शिकतील.

### • सहली

मुलांना सहल अतिशय प्रिय! पण आजवर दरवर्षी पैशांपाशी सहलीचे गाडे अडायचे. या वर्षी एका संस्थेच्या मदतीने आम्हाला सहलींसाठी चांगला निधी उपलब्ध होऊ शकला.

सर्व मुलांना आणि खेळघर मित्रगटातील पालकांना देखील समुद्रकिनारी सहल हवी होती. लहान मुलांची समजून काढून त्यांना पाण्याच्या सान्निध्यात म्हणजे water sports असतील अशा ठिकाणी सहल नेली. सहलीच्या निमित्ताने, त्या ठिकाणची माहिती शोधणे, नकाशाचा अभ्यास करणे, खर्चाचा अंदाज करणे, bookings करणे इत्यादी सर्व कामे मुले आनंदाने करायला शिकतात. व्यवस्थापनाची जबाबदारीदेखील मोठ्या गटांमध्ये मुलेच घेतात. सहलीनंतर चित्रे काढणे, त्या अनुभवाबद्दल लिहिणे हे ओघाने आलेच. सहली निमित्ताने ताई आणि मुलांचे संवाद गट होतात. नियम ठरवले जातात. एकमेकांना समजून घेणे, मदत करणे हे सारे सहज साधते. नाती पक्की होतात.

### • खेळघरातील 'खेळ' प्रकल्प

"Project-Based Language Learning' ही अध्ययन पद्धती प्रत्यक्षात उतरवत खेळघरातील भाषेच्या वर्गात 'खेळ' या प्रकल्पाला जोडून मराठी भाषेचे काम झाले. महिनाभर चाललेल्या या प्रकल्पात मुलांनी आधुनिक आणि पारंपरिक खेळ यांचा अभ्यास केला. आपल्या ताईंच्या लहानपणी कोणते खेळ होते हे शोधून काढले, ते खेळून बघितले. ताईंनीही मुलांचे नवीन खेळ शिकून घेतले.

मुलांनी पारंपरिक आणि आधुनिक खेळ याच्या याद्या तयार केल्या. आपल्याला माहीत नसलेले खेळ जाणून घेण्यासाठी ताईंची मुलाखत घ्यायची ठरली. ताईंना प्रश्न विचारताना मुले 'मुलाखत कशी घेतात' हे शिकू लागली. ताईने मुलांना नोंदी कशा घ्यायच्या हेही शिकवले. खेळाचे नियम कसे लिहायचे हे 'कुल्फी' अंकातील एका उपक्रमाच्या आधाराने शिकून घेतले.

एखादा खेळ उत्तम पद्धतीने खेळण्यासाठी काय करावे लागेल? असा प्रश्न विचारला असता मुलांनी अनेक बारीक निरीक्षणे नोंदवली - आंधळी कोशिंबीरसाठी, लै फोकसनी ऐकावं लागतंय ताई,



कॅरमसाठी कोण चांगला खेळतो तो नक्की काय करतो हे बघायला लागतं, कबड्डीसाठी दम, ताकद आणि फास्ट पाहिजे खूप, अशी वेगवेगळी निरीक्षणे मुलांनी सांगितली. मुलांच्या नेहमीच्या अनुभवातले खेळ असल्यामुळे त्याबद्दल मुले भरभरून बोलत होती.

गटागटाने एक खेळ निवडून त्यासाठी एक पोस्टर तयार केले आणि त्याचे सादरीकरण केले. लोकांसमोर उभे राहून एखाद्या विषयाबद्दल नेमकेपणाने बोलणे याचाही अनुभव मुलांना मिळाला.

### • युवक गटाची पुनर्रचना

या वर्षी खेळघरातील दहावीची १५ आणि बारावीची ४ मुले उत्तीर्ण झाली दहावीच्या ७ मुलांना ६० ते ८० टक्क्यांच्या दरम्यान मार्क मिळाले आहेत. बारावीच्या चारही मुलाना ५० ते ७० टक्क्यांच्या दरम्यान मार्क मिळाले आहेत. सर्व मुलांना पुढील शिक्षण घ्यायचे आहे.

युवकगटातील मुलांची संख्या आता ४० च्या घरात गेली आहे. आठवड्यातून एका वर्गातून त्यांच्याबरोबर पुरेसा संवाद होत नाही. काही मुले खूपच छान पुढे येतात पण काही मुले मात्र या गटातून गळतात. गटात जास्तीत जास्त मुले टिकावीत आणि मुलांना या टप्प्यावर आवश्यक ती मदत मिळावी या उद्देशाने, या वर्षी एप्रिलपासूनच युवक गटाची पुनर्रचना करण्यासंदर्भात काम चालू केले. मुलांशी, सर्व संबंधित साधन व्यक्तींशी, इतर वर्ग शिक्षकांशी बोलल्यावर काही एक दिशा मिळत गेली. या वर्षीपासून शैलजाताईंच्यासमवेत राधा जोशी मुलांसमवेत मानसिक स्वास्थ्यासंदर्भात काम बघणार आहेत. श्रीशैल बिराजदार प्रकल्प पद्धतीने मुलांसमवेत काही काम करणार आहेत. स्वतःच्या इच्छेने मुलांनी एखाद्या मुद्द्यासंदर्भात मनापासून काम करायचे ठरवले, ते सर्वांसमोर सादर केले तर त्यातून मुले पुढे अनेक गोष्टी शिकतात.



नव्याने गटात आलेल्या दहावीच्या मुलांना गटाशी जुळवून घेता यावे म्हणून ज्योती कुदळे काम करणार आहेत. आठवडी वर्गाच्या सोबतच जरूर लागेल तेथे रविवारी workshops देखील घेऊ, असे ठरले आहे. मुलांना नर्मदा बालमेळा, लोकशाही उत्सव अशा कार्यक्रमांमध्ये सहभागाची संधी मिळावी. बेबाक कलेक्टीव, पन्हाळा येथे झालेल्या गोविंद पानसरे युवा जागर अशा कार्यशाळांमध्ये सहभागाची संधी, करियर संदर्भात वैयक्तिक समुपदेशन अशा अनेक गोष्टीसंदर्भातील काम चालू आहे.

या सगळ्या आखणीत अर्थातच खर्च वाढत आहेत. या प्रकल्पाचे काम आणि मुलांना दिली जाणारी शैक्षणिक मदत ही खेळघराच्या मित्र सुहृदांकडून उभी राहील अशी आशा आहे.

गेल्या वर्षीप्रमाणेच या वर्षीदेखील सर्व आव्हानांना एकजुटीने तोंड देत आम्ही हे काम उत्साहाने आणि सर्जनशीलतेने पुढे नेऊ हा विश्वास आहे....

तुम्ही फक्त पाठीवर हात ठेवून लढ म्हणा...

वार्तापत्र वाचून आपले मत जरूर कळवा.

## थेट भेट

## आमंत्रण

पालकनीती परिवारच्या खेळघरातील युवकगटाच्या मुलांना भेटण्याची, समजून घेण्याची संधी म्हणजे थेट भेट कार्यक्रम !

**शुक्रवार दि. १८ जुलै २५ रोजी सायं. ५ ते ८** या वेळात खेळघराच्या ऑफिसमध्ये थेट भेट कार्यक्रम ठरवला आहे. या कार्यक्रमासाठी आपल्याला मन:पूर्वक आमंत्रण!

आम्ही वाट पाहू.

**खेळघर कार्यकर्ते**

**पत्ता : गुरुप्रसाद अपार्टमेंट,**
**२३ आनंद निकेतन सोसायटी, कर्वेनगर,**
**पुणे ४११०५२. मोबाईल – ९७६३७ ०४९३०**

## पुढील योजना

मे महिन्यात १५ दिवस मुलांना सुट्टी देऊन आम्ही प्रकल्पाचे, शिक्षकांचे आणि मुलांचे मूल्यमापन करतो. समोर आलेल्या प्रश्नांवर उत्तरे शोधली जातात.

या वर्षीच्या मूल्यमापनात खालील गोष्टी ठरल्या -

- या वर्षी मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून विशेष प्रयत्न करावेत
- दर आठवड्यातून एक वार मुलांच्या वेळापत्रकात वाचनासाठी राखून ठेवला जाईल. शिक्षकांच्या वाचनाला गती यावी म्हणून पंधरा दिवसांतून एक सत्र आखले जावे.
- विचार करणे, logical thinking, अंदाज करणे, कल्पना करणे, निरीक्षण, वाचन, लेखन, संवाद कौशल्ये अशा शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांवर काम व्हावे. त्यासाठी मापन, ओरिगामी, नकाशा वाचन, कालमापन, दुकान जत्रा अशा modules ची सविस्तर आखणी व्हावी.
- शिक्षकांना सर्जनशीलतेने वर्गाची आखणी करता यावी म्हणून काम व्हावे.
- मूल्यमापनाच्या अधिक समावेशी पद्धतींचा शोध घ्यावा.
- निधी संकलनासाठी linked in, what's app, instagram यासारख्या सोशल मिडियाचा वापर करायला सक्षम व्हावे.


संपर्क

**खेळघर, पालकनीती परिवाराचा उपक्रम**
गुरुप्रसाद अपार्टमेंट, २३, आनंदनिकेतन सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११०५२.
फोन - ९८२२८७८०९६, ९७६३७०४९३०.
E-mail: khelghar@gmail.com
Website : www.palakneeti.in

Account Name - **PalaknitiPariwar**
Bank Name : State Bank Of India
Account NO : 35689944253
Type of Account: Current
IFSC Code: SBIN0001110
Branch Code : 01110
Branch : Deccan Gymkhana

Khelghar YouTube channel: https://www.youtube.com/khelghar